NAVJYOT /Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# महात्मा गांधी यांचे महिला सक्षमीकरण विषयक विचार

**डॉ. गंगासागर तुळसीदास चोले,** सहा.प्राध्यापिका, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय.गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

---

**प्रस्तावना:**

स्त्री आणि पुरुष हे जीवनाच्या रथाची दोन चाक असतात ही चाकं बरोबरीने चालली तरच जीवन आनंददायी सुखमय होते पण आमच्या भारत देशामध्ये पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये कित्येक शतक गेली 19 व्या शतकाच्या प्रथम चरणात इंग्रजांच साम्राज्य होतं नवीन कायदे आले सर्वांसाठी एकच कायदा गरीब श्रीमंत लहान मोठा अस्पृश्य कोणीही असो कायद्यासमोर सर्व सारखेच शिक्षणामुळे ज्ञानाची नवी दार उघडली महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाज परिवर्तन घडवून आणले त्यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना घरी शिकवले आणि मुलींसाठी पहिली शाळा 1848 रोजी पुण्यात सुरू केली तेव्हापासून स्त्री शिक्षणाला सुरुवात झाली कुटुंबात मुलांना मुलींपेक्षा प्राधान्य देण्यात येते व मुलाचा जन्म झाल्यावर आनंद मनवला जातो हे महात्मा गांधींना पसंत नव्हते बालविवाह हुंडा पद्धती देवदासी प्रथा आणि वेश्याव्यवसाय याला त्यांचा विरोध होता स्त्री-पुरुषांना समान हक्क देण्याचा त्यांनी पुरस्कार केला त्यांच्या यंग इंडियाच्या अंकात ते म्हणतात वर्षानुवर्षाच्या पुरुषांच्या कडून झालेल्या दमनामुळे स्त्रियांमध्ये न्यूनगंड निर्माण झालेला आहे व त्या स्वतःला कनिष्ठ समजतात मात्र दृष्ट्यांनी स्त्रियांच्या समान दर्जाला मान्यता दिली आहे स्त्रीला बरोबरीचे व सन्मानाचे स्थान द्यायला पाहिजे व मी स्वतः सुद्धा सुरुवातीस गुलामासारखे वाघ गेले म्हणून दोषी ठरतो परंतु नंतर माझी मनोवृत्ती बदलली असे ते कबूल करीत स्त्री शिक्षणाचा त्यांनी पुरस्कार केला

**उद्दिष्टे:**

1) महिला सक्षमीकरण संकल्पना अभ्यासणे.

2) महिला सक्षमीकरण संदर्भात महात्मा गांधींच्या विचारांची प्रासंगिकता अभ्यासणे.

3) महात्मा गांधी यांचे स्त्री पुरुष समानतेचे विचार अभ्यासणे.

**गृहीतके:**

1) महात्मा गांधी स्त्री पुरुष समानतेचे पुरस्कर्ते आहेत.

2)महात्मा गांधी यांचे विचार महिला सक्षमीकरण संदर्भात प्रासंगिक आहेत.

संशोधन पद्धती : प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीय तथ्य संकलन तसेच विविध ग्रंथालयीन संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

**महिला सक्षमीकरण व्याख्या :**

1)"दि. सोशल वर्क डिक्शनरी बारकेल यांच्या मते सक्षमीकरण म्हणजे वैयक्तिक गट आणि सामाजिक पातळीवरील व्यक्तीची क्षमता व पात्रता उभारणी करण्याची प्रक्रिया होय."

2) "महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांच्या अंगी निर्णय घेण्याची, नियंत्रण करण्याची, संघटित करण्याची, मतप्रदर्शन करण्याची, कृतीशील कार्यक्रमाचे आयोजन, लोकसंपर्क, आर्थिक व्यवहार करण्याची क्षमता व आवड निर्माण होणे होय.

**महात्मा गांधी यांचे महिला सक्षमीकरणावरील विचार**:

आजच्या समाजात आणि राजकारणात स्त्रियांच्या सबलीकरणाचा विचार महत्त्वाचा विषय झालेला आहे. गांधी हे प्रखर स्त्री हक्कवादी आणि स्त्रीत्वाचे उदात्तीकरण करणारे होते. समाजात स्त्रियांवर होत असलेल्या अन्याय व अत्याचारांची त्यांना चीड होती. गांधीजींनी महिलांना सक्षमीकरणाचा विषय म्हणून पाहिले नाही उलट त्यांचा असा विश्वास होता की, स्त्रिया स्वतःच्याच नव्हे तर संपूर्ण मानव जातीच्या कल्याणात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. महिलांना मुक्त व्हायचे असेल तर त्यांनी निर्भय व्हायला हवे, असे ते म्हणायचे. कुटुंब आणि समाजाच्या बेड्या तोडून त्यांच्यावर लादलेल्या अन्यायाला विरोध केल्यानेच त्यांना अत्याचारातून मुक्तता मिळू शकते गांधीजी स्त्रियांना कोणत्याही बाबतीत पुरुषांपेक्षा कमी मानत नव्हते, उलट त्यांचा असा विश्वास होता की, स्त्रिया पुरुषांपेक्षा अधिक दयाळू आणि बलवान आहेत. स्त्रियांना कमकुवत म्हणणे त्यांना आवडत नसे, ते स्त्रियांच्या आंतरिक शक्तीचा अपमान मानत. ज्यांना आपण कमकुवत म्हणतो ते बलवान झाले तर प्रत्येक असहाय्य माणूस बलवान होईल असे त्यांनी अनेकदा

सांगितले. 1921 मध्ये महिलांच्या मतदानाचा मुद्दा उपस्थित झाला तेव्हा त्यांनी त्याचे जोरदार समर्थन केले. 2 मे 1936 च्या हरिजनमध्ये देशाच्या शिक्षणावर आपले मत मांडताना गांधीजींनी स्पष्टपणे सांगितले होते की, स्त्रीने इतके बलवान झाले पाहिजे की, तिने आपल्या पतीला नाही म्हणण्यास संकोच करू नये.

महिलांना त्यांच्या हक्क आणि कर्तव्यांची माहिती असायला हवी, असे ते म्हणाले. महिलांचे सक्षमीकरण करायचे असेल तर कुटुंबातूनच पुढाकार घ्यावा लागेल असे गांधी सांगत होते. जोपर्यंत ती चुकीच्या गोष्टी सहन करत राहील तोपर्यंत तिच्यावर अत्याचार होतच राहतील. महात्मा गांधी असे म्हणाले होते की, ज्या दिवसापासून स्त्री रात्री रस्त्यावर मोकळेपणाने फिरू लागेल त्या दिवसापासून भारताला स्वातंत्र्य मिळाले असे म्हणता येईल.

महिलांना असाह्य म्हणण्याला गांधींचा ठाम विरोध होता. घरच्या वैयक्तिक आयुष्यातील अनुभवातून त्यांनी स्त्रियांचा आदर करायला शिकला होता. पत्नी कस्तुरबा बद्दलचे त्यांचे विचार बदलत गेले आणि आदर वाढत गेला. गांधींच्या सहकाऱ्यांमध्ये महिलांचा विशेष सहभाग होता गांधींनी सीता आणि द्रौपदी यांना स्त्रियांसाठी आदर्श मानले. त्यांच्या नजरेत त्या दोघीही धाडसी महिला होत्या ज्या चुकीच्या विरोधात सतत आवाज उठवत होत्या. गांधींनी ही एकदा म्हटलं होतं की, मी स्त्री असतो तर त्यांनी पुरुषांकडून होणारे अत्याचार अजिबात सहन केले नसते. महात्मा गांधींचा स्त्रियाबद्दलचा विचार त्यांच्या 'माझे सत्याचे प्रयोग' या आत्मचरित्राच्या रूपाने बहुतांशी दिसून आला आहे, पण त्या काळीही त्यांची विचारसरणी महिलांच्या सक्षमीकरणाइतकी प्रबळ होती, ती या काळातील लोकांना दिसून आली नाही. महिलांचा कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रातील स्थान व दर्जा पुरुषांच्या बरोबरीचा असून स्त्रियांनी स्वतःला कमी न लेखता आपली स्थिती व दर्जा पुरुषांच्या बरोबरीने सिद्ध करण्यासाठी पुढे सरसावले पाहिजे. असा आग्रह गांधीजी करतात. समाजात स्त्रियांना सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी त्यांच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन मानवतावादी व उदारमतवादी असण्याची आवश्यकता महात्मा गांधी स्पष्ट करतात. समाजव्यवस्थेने व धर्मव्यवस्थेने महिलांना विविध सामाजिक व धार्मिक बंधनांमध्ये अडकवून ठेवलेले होते. बालविवाह, सतीप्रथा, जरठकुमारी विवाह, विधवा विवाह इत्यादी विविध प्रथा परंपरा स्त्रियांवर लादल्या गेल्या होत्या. महिलांना विविध बंधनामध्ये अडकवून त्यांच्या भावनांचा व त्यांचा सामाजिक विकास नाकारणाऱ्या विविध प्रथा परंपरांचा गांधीजींनी विरोध केला. गांधीजींनी स्त्रियांना निर्भय होण्याची, असाह्य स्त्रियांची सेवा करण्याची, आपली वैशिष्ट्ये सांभाळून पुरुषांपेक्षा आपण कमी नाहीत यासाठी सातत्याने विचार मांडून ते स्त्री वर्गावर ठसवण्याचा प्रयत्न केला. गांधीजींनी स्त्री पुरुष समानतेचा स्वीकार करताना स्त्रियांमधील न्यूनगंडाची भावना नष्ट करण्यासाठी सतत प्रयत्न केला.

**निष्कर्ष** :

1)महात्मा गांधीजींच्या महिलाविषयीच्या योग्य दृष्टिकोनामुळे स्त्री पुरुष समानता प्राप्त झाली.

2)महिला सक्षमीकरणाविषयीची महात्मा गांधीजींची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली.

3) भारतीय लोकशाही अधिक सक्षम झाली.

4) महात्मा गांधीजींचे महिलासक्षमीकरणाविषयीचे विचार महिलांना नवसंजीवनी प्राप्त करून देणारे ठरले.

5) महात्मा गांधीजींच्या महिला विषयीच्या मानवतावादी दृष्टिकोनामुळे स्त्रियांचा शैक्षणिक दर्जा सुधारला.

6)महिलांमध्ये आत्मसन्मानाची भावना निर्माण झाली.

**संदर्भग्रंथसूची** :

1)पाटील डॉ. डी. आर., महात्मा गांधी विचार व समकालीन समाज

2)पंडित नलिनी, गांधी.

3) पांडेय डॉ. राजबली, हिंदू सरकार.

4) श.गो. देवगावकर, राजकीय विचारवंत, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

5) गुप्ता कमलेशकुमार, महिला सशक्तिकरण, बुक एनकलेव्ह, जयपुर.

6)इंटरनेट.